**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART - TWO

**गुरूवार, दिनांक. १९ मार्च, २०१५**

## अधिसुचना

क्रमांक : २६/२०१५ दिनांक :१९/०३/२०१५

**विषय : स्व. प्रा. (कु.) कुसुमताई नांदे वक्तृत्व स्पर्धा - २०१५-२०१६.**

सर्व सामान्यांच्या माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, २०१५-२०१६ वर्षाकरीता **" स्वच्छ भारत निर्मितीमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग "** या विषयावर शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी, २०१५ रोजी स्व. प्रा. (कु.) कुसुमताई नांदे वक्तृत्व स्पर्धा विद्यार्थी भवन, विद्यापीठ परिसर, येथे आयोजित केली होती. स्पर्धेच्या नियमानुसार परीक्षकांनी सदर वक्तृत्व स्पर्धेत खालील तीन स्पर्धकांना पारितोषिकाकरिता पात्र घोषित केले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | **प्रथम पारितोषिक** | **रू. १०००/-** | श्री. आशिष विजयराव कांबळे<br>शासकिय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था, अमरावती |
| **२.** | **व्दितीय पारितोषिक** | **रू. ७००/-** | कु. मोनिका नाजुकराव सिरसाट<br>श्रीमती राधादेवी गोयनका महीला महाविद्यालय, अकोला. |
| **३.** | **तृतीय पारितोषिक** | **रू. ३००/-** | श्री. कपिल धनराज ढोके<br>श्री शिवाजी कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला |

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## अधिसुचना

क्रमांक २७/२०१५ दि. १९ /०३/२०१५

**विषय – पर्यावरण पुरस्कार – २०१४**

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता कळविण्यात येते की, पर्यावरण पुरस्कारासाठीची नियमावली नियम क्र. ४/२०११ नुसार पर्यावरणासंबंधी विद्यापीठाला प्राप्त झालेल्या विविध पुरस्कारांच्या मुळ रकमेच्या व्याजातून विद्यापीठस्तरावर सुरु करण्यात आलेल्या " पर्यावरण पुरस्कार - २०१४ " साठी संस्था गटातून **श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती** व वैयक्तीक गटातून **श्री. राजेंद्र विठ्ठलराव गायगोले, "साईछत्र", सहयोगनगर, बनोसा, दर्यापूर, जि. अमरावती.** यांची पुरस्कार निवड समितीने निवड केली आहे. वृक्षारोपन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जनजागृती व प्रसार या बाबतची संबंधित संस्था / व्यक्तिगत माहिती पुढील प्रमाणे आहे.

## संस्थागट

दि. २०/१०/२०१४ व दि. २१/१०/२०१४ रोजी सकाळी - ११.०० वाजता समितीच्या सर्व सदस्यांनी प्रस्तावकर्त्याचे प्रक्षेत्राला भेट देवून संपुर्ण प्रक्षेत्राची पाहणी केली. समितीचे सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रस्तावकर्त्या संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी यांच्याशी चर्चा करून त्यांनी पर्यावरणासंबंधी केलेल्या कार्याची व त्यासंबंधी भविष्यातील योजनाची माहिती घेण्यात आली. प्रस्तावकर्त्याने प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या वृक्षारोपनासंबंधीची तसेच पर्यावरणासंबंधीची दिलेली माहिती, प्रक्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आल्यानंतर त्या कामामध्ये सुसंगता दिसून आलेली आहे. प्रस्तावकर्त्या संस्थाने सन २००९ ते २०१३ या कालावधीत एकूण ३४ हेक्टर (खाजगी, सामुहीक) जमीनीवर विविध प्रजातीचे एकूण ९५२५ झाडांची लागवड केल्याचे समितीला दिसुन आले. संस्थाने सामुहीक अथवा खाजगी जमिनीवर सरपण / वैरण देणाऱ्या झाडांची लागवड केलेली आहे. प्रस्तावकर्त्याने वृक्षलागवडीचे कार्यक्रमात ग्रामीण दुर्बल घटकांसाठी व स्त्रियांसाठी राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमा अंतर्गत ग्रामीण महिलांचा व मुलांचा सहभाग घेवून वृक्षलागवड व वृक्षसंवर्धना प्रति जनजागृति केलेली आहे. विविध गावात व आदिवासीबहुल क्षेत्रांमध्ये संस्थेच्या शाळा, महाविद्यालयाव्दारे वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन करण्यात येत असल्याने ग्रामस्थांना इंधन व जनावरांना वैरण उपलब्ध झालेले आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी भरघोस मदत झालेली आहे. प्रस्तावकर्त्याने संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांव्दारे आवारातील गांजर गवत निर्मुलन घनकचरा निर्मुलन इत्यादि उपक्रम व विविध खेडयांमधे जलसंवर्धनासाठी बंधाऱ्यांची निर्मिती विद्यार्थ्यांनी श्रमदानातून राबविलेले आहे. त्यामुळे जमिनीमधील पाण्याचा स्तर उंचावला असून ग्रामस्थांना वापरांकरिता व शेतीकरिता पाणी उपलब्ध झालेले आहे, संस्थेतर्फे सदर कार्य अविरत सुरु आहे. प्रस्तावकर्त्याने संस्थेमधील अंतर्गत मार्गाचे दोन्ही बाजुस वृक्षारोपन करुन आजपावेतो संवर्धन करण्याचे कामे करित आहे. आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात LAPTOP (Life long Association through Plantation of Trees and Outreach Programe) ही योजना राबविल्या जात आहे. प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला एक झाड भेट देवून त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांला देण्यात येते व महाविद्यालय प्रशासन ह्या कामी त्या विद्यार्थ्याला संपुर्ण सहकार्य केलेले आहे. प्रस्तावकर्त्या संस्था अपारंपारिक उर्जास्त्रोत्रांच्या वापर व प्रचार प्रसरासाठी अहोरात्र कार्य करित असून सन २०१५ पर्यंत विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्वात मोठे सौर उर्जा केंद्र निर्माण करण्याचे ठरविले आहे. त्यातील पहिला टप्पा ५० किलोवॅट विद्युत निर्मिती करुन यथस्वीरित्या पूर्ण केला आहे. संस्था विविध शाळा महाविद्यालय चालवित असून अनेक पर्यावरण पुरक उपक्रम राबवित आहे. प्रस्तावकर्त्या संस्थाने अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयाच्या अंतर्गत विशेष शिबीर पाडा येथे ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जलसंवर्धनासाठी रेन वॉटर हार्वेस्टींग उपक्रम राबविलेले आहे. व संस्थेने अमरावती येथील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये रेन वॉटर हार्वेस्टींगचे कार्य केलेले आहे. पर्यावरण संवर्धनाकरिता संस्था नेहमीच विविध कार्यक्रमांचे आयोजन जसे - वृक्षदिंडी, सायकल रॅली, सेमीनार, कॉन्फरन्स, वृत्तपत्र लेख, प्रदर्शनी इत्यादी व्दारे जनजागृती करित असते तसेच विज्ञानधिष्टीत विविध उपक्रम राबवित आहे. संस्थेने राबविलेल्या पर्यावरणा संबंधीच्या विविध उपक्रमामुळे पर्यावरण संतुलन राखण्यास मदत झालेली आहे.

वरिल संपूर्ण बाबी लक्षात घेता, प्रस्तावकर्त्या संस्थेने केलेले कार्य पर्यावरणाचे दृष्टीने उत्कृष्ठ असल्यामुळे **श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती** यांना " **संस्था** " गटातून विद्यापीठाचा " **पर्यावरण पुरस्कार - २०१४** " घोषित करण्यात आला आहे.

(२)

(२)

## वैयक्तिक गट

दि. २६/१०/२०१४ रोजी दुपारी ०३.०० वाजता पर्यावरण पुरस्कार निवड समितीने प्रस्तावकर्त्याचे कामाचे ठिकाणी भेट देवून त्यांनी केलेल्या पर्यावरणासंबंधी वैयक्तिक स्तरावर केलेल्या कामाची पाहणी करण्यात आली आणि त्यांचेकडून प्रस्तावात नमुद असलेल्या बाबी संबंधी सविस्तर माहिती घेण्यात आली. प्रस्तावकर्ते हे आदर्श हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापुर जि. अमरावती येथे अध्यापक म्हणून कार्यरत आहे. प्रस्तावकर्त्यांनी सन २००९ ते २०१३ पर्यंत एकूण ४१०० झाडांची लागवड केलेली आहे. प्रस्तावकर्ते विविध शैक्षणिक क्षेत्रात कार्य केले असले तरी त्यांनी विविध संस्थान मध्ये अनेक पदे भुषविलेली आहे. प्रस्तावकर्त्यांनी अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचा बाबत शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातुन सौरचुल, सौरबंब, सौरपथदिवे, बायोगॅस प्लँट याविषयी सविस्तर माहिती व फायदे समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केलेले आहे. प्रस्तावकर्ते मागिल १४ वर्षापासून याक्षेत्रात कार्य करित आहे. प्रस्तावकर्त्याने पर्यावरणाशी संबंधीत विविध प्रकारचे प्रशिक्षण सुध्दा घेतलेले आहे. त्यांनी पर्यावरण क्षेत्रात जनजागृतीचे विविध प्रकारचे कार्य केलेले आहे. प्रस्तावकर्त्यांनी विविध प्रकारचे सामाजिक तसेच साहित्य क्षेत्रात कार्य केलेले आहे. प्रस्तावकर्त्यांनी वृक्ष लागवडी सोबतच त्यांचे संवर्धन व संरक्षण तितकेच महत्वाचे आहे. ही भावना विद्यार्थ्यांच्या माध्यमातुन पालकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. एक कुटूंब– एक झाड या संकल्पनेतुन आपल्या परिसरात एक वृक्षरोपटे लावून त्याचे संरक्षण करण्याचे आवाहन पालक सभेतून केल्याचे समितीला दिसून आले. प्रस्तावकर्त्यांनी पर्यावरण क्षेत्रात केलेल्या कार्यामध्ये त्यांना विविध पुरस्कार प्राप्त झालेले आहे. तसेच प्रस्तावकर्त्याने खालील कार्यक्रमाच्या माध्यमातुन पर्यावरण क्षेत्रात कार्य केलेले आहे.

- राष्ट्रीय हरित सेना प्रकल्पा अंतर्गत जिल्हा स्तरीय “मास्टर ट्रेनर्स” म्हणून कार्यरत.
- विविध स्तरावरिल पर्यावरण विषयक प्रशिक्षणात सहभाग.
- सर्पज्ञान जागृती. मातीचे गणपती बनविणे, होळी प्रबोधन, जलसंवर्धन, फटाके व वाहने या माध्यामातुन होणाऱ्या प्रदूषणाबद्दल जाणीव जागृती अभियान.
- उन्हाळ्यात पक्षांसाठी पाण्याची उपलब्धता करुन देण्यासाठी भांडी वाटप करुन “चिमणी वाचवा” अभियान सक्रिय सहभाग.
- वीज बचत व सौरऊर्जेच्या बाबत प्रचार व प्रसार अभियान.
- मार्गदर्शक – जलसंधारण प्रचार व प्रसार प्रकल्प जनहित कक्ष.

प्रस्तावकर्त्यान पर्यावरण संवर्धनामध्ये समाविष्ठ असणा-या बाबींपैकी वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन जलसंवर्धन व जनजागृती इत्यादी कार्यामध्ये भरीव कामगिरी केलेली आहे.

वरिल संपूर्ण बाबी लक्षात घेता, प्रस्तावकर्त्याने केलेले कार्य पर्यावरणाचे दृष्टीने उत्कृष्ठ असल्यामुळे **श्री. राजेंद्र विठ्ठलराव गायगोले, “ साईछत्र ”, सहयोगनगर, बनोसा, दर्यापूर, जि. अमरावती.** यांना “ **वैयक्तिक** ” गटातून विद्यापीठाचा “ **पर्यावरण पुरस्कार - २०१४** ”घोषित करण्यात आला आहे.

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****